**प्रकरण :- दुसरे**

# संशोधन पध्दती व संशोधन साहित्याचा आढावा

---

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण :- दुसरे | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **02. संशोधन पध्दती व संशोधन साहित्याचा आढावा** | 34-63 |
| 2 | प्रास्तविक | 35 |
| 2.1 | भाग अ- संशोधन पध्दती | 35 |
| 2.2 | तथ्य संकलन | 36 |
| 2.3 | संशोधनाची पध्दती | 37 |
| 2.3.1 | प्राथमिक स्त्रोत | 37 |
| 2.3.2 | दुय्यम स्त्रोत | 38 |
| 2.3.2 | तथ्य विश्लेषण | 38 |
| 2.4 | नमुना निवड | 39 |
| 2.4.1 | नांदेड जिल्हयातील नमुना म्हणून निवड केलेले तालुके व महिला सदस्य | 40 |
| 2.4.2 | संशोधन प्रक्रिया | 42 |
| 2.5 | भाग ब - संशोधन साहित्याचा आढावा ( Review of Literature) | 44 |

## प्रकरण :- दुसरे

# संशोधन पध्दती व संशोधन साहित्याचा आढावा

### 2 प्रास्ताविक

संशोधन कर्त्याने संशोधनाचे कार्य सुलभ व शास्त्रोक्त पध्दतीने व्हावे म्हणून संशोधनकर्त्याने या प्रकरणामध्ये दोन भाग केले असून पहिल्या भागात संशोधनपध्दतीचा सविस्तर अभ्यास केला असून दुस-या भागात संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे. ते पुढील प्रमाणे मांडले आहे.

### 2.1 भाग अ- संशोधन पध्दती

संशोधन करीत असताना ते संशोधन जो पर्यन्त शास्त्रीय पध्दतीने होत नाही तोपर्यन्त अपेक्षित परिणाम आपणास मिळत नाही. संशोधन प्रक्रिया मुळातच जटील प्रक्रीया आहे त्याचा अभ्यास योग्य टप्पाटप्याने करून त्याचे विश्लेषण करणे गरजेचे असते.

भारतीय संस्कृतीमध्ये कुटुंबाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. कुटुंबात महिलांचा सहभाग अतिशय महत्वाचा आहे. कुटुंबात एक तरी महिला सदस्य असतेच. त्याचा विकास झाला तर आपल्या देशाचा विकास होइल. या विषयाची निवड करताना हा उद्देश डोळयासमोर ठेवून संशोधनास प्राधान्य दिले आहे.

नमुना पध्दतीमध्ये समग्राचे प्रतिनिधी म्हणून लहान भाग निवडून संशोधन करण्यात येते. आपल्या दैनंदिन जीवनात कळत नकळतपणे आपण नमुना निवडीवरूनच काही निष्कर्ष मांडत असतो. 'शिता वरून भाताची

परीक्षा' हा नमुना निवडीचाच प्रकार आहे. रोग्याची रक्ततपासणी करताना त्याच्या शरीरातील रक्ताच्या काही थेंबावरून केली जाते. आपणास जर एखाद्या व्यक्तिच्या रक्ताची तपासणी करायची असेल तर आपण काही थेंब रक्ताचे घेतो व त्यांची तपासणी करतो. काही रक्तांच्या थेंबाची तपासणी केली जाते संपूर्ण रक्तांचे अनुमान काढले जाते. धान्य परिक्षण, असे अनेक दैनंदिन घटनांवरून आपल्याला असे स्पष्ट करता येते की समग्र चाचणीपेक्षा नमुना चाचणीचा वापर सर्रासपणे केला जातो.

सामाजिक शास्त्रात लोकसंख्येच्या अध्ययनाच्या पैरामेट्रिक पध्दती आणि नॉन पैरामेट्रिक पध्दती या दोन पध्दती आहेत. पैरामेट्रिक पध्दती म्हणजे ज्याद्वारे संपूर्ण समूह किंवा लोकसंख्या यांना परीक्षणाचे क्षेत्र मानून संशोधन व सर्वेक्षण केले जाते. तर नॉन पैरामेट्रिक पध्दतीमध्ये संपूर्ण लोकसंख्येमधून एका विशिष्ट प्रातिनिधिक समूहाची निवड करून त्याचे अध्ययन केले जाते. नमुना हा या नॉन पैरामेट्रिक पध्दतीचा आधार आहे. नमुना हा समग्रातून किंवा विश्वातून निवडण्यात आलेला एक भाग असतो. विश्व किंवा समग्रातील फक्त काही प्रातिनिधिक एककांची निवड करणे म्हणजे नमुना होय.

## 2.2 तथ्य संकलन :-

प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांद्वारे जमा करण्यात आली आहे. वास्तविक व विश्वसनीय तथ्ये हाच वैज्ञानिक वर्णनाचा आधार होता. त्यासाठी संकल्पना स्पष्ट करण्यात आली. गृहितके तपासण्यात आले. प्रकरणाची मांडणी करण्यात आली व संपूर्ण प्रबंधाचे लिखाण करीत असताना अचूक व पर्याप्त म्हणून जे तथ्य संकलन

करण्यात आले त्याच शास्त्रीय पध्दतीन विविध प्रकारचे तक्ते, आलेख यांचा अवलंब करण्यात आला आहे. त्याव्दारे संशोधनातील निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत.

## 2.3 संशोधनाची पध्दत :-

प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी वर्णनात्मक व स्पष्टीकरणात्मक संशोधनपध्दतीचा वापर केला आहे. संशोधनासाठी आवश्यक असणाऱ्या माहितीचे संकलन सर्वेक्षण व निरीक्षण पध्दतीने करण्यात आले असून प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक स्वरूपाची माहिती प्रश्नांवलीच्या साहाय्यांने व निरीक्षण मुलाखतीदवारे संकलीत केलेली आहे.

प्रस्तुत संशाधन कार्य प्रामुख्याने प्राथमिक सामुग्रीवर आधारीत आसुन या संशोधनाची उपयुक्तता वाढविण्यासाठी दुय्यम सामुग्रीचा उपयोग करण्यात आला आहे.

### 2.3.1 प्राथमिक स्त्रोत :-

संशोधनासाठी आवश्यक ती माहिती Field work व्दारे मिळवणे एक अनिवार्य भाग असतो. यात प्रामुख्याने प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष निरीक्षण, मुलाखत तंत्र, प्रश्नावली, चर्चा, कार्यशाळा यासारख्या विविध मार्गाने तथ्य संकलन करावे लागते. विषयाचे स्वरुप लक्षात घेवून प्रश्नावली तंत्राचा अवलंब करण्यात आला आहे. ही प्रश्नावली तयार करताना प्रमुख मुद्दयांचा आधार घेण्यात आला आहे. समाजातील सर्व स्तरातील महिलांशी चर्चा करून त्यांचे विचार जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

संशोधनासाठी आवश्यक माहिती प्रश्नांवली द्वारे जमा करण्यात आली. यासाठी नांदेड जिल्हयातील दहा तालुक्याची साधा यादृच्छिक नमुना पदधतीने निवड करण्यात आली. प्रत्येक तालुक्यातील पाच गाव व प्रत्येक गावातील दहा महिला असे पाचशे महिलांची निवड साधा यादृच्छिक नमुना पध्दतीने करण्यात आली आहे. त्याच्यांकडून प्रश्नांवली भरून घेतली आहे.

**2.3.2 दुय्यम स्त्रोत :-**

संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी प्राथमिक स्त्रोताशिवाय दुय्यम स्त्रोताचाही संशोधनासाठी वापर करण्यात आला आहे. यात विविध प्रकारचे पुस्तके, ग्रथ, लेख, प्रबंध, वार्षिकांक, मासिके, साप्ताहिके, दैनिक वर्तमानपत्र, प्रकाशित व अप्रकाशित साहित्य, विविध संस्थाचे अहवाल, जिल्हा माहिती कार्यालय, ग्रंथालय, संमेलने, कार्यशाला या सारख्या अनेक स्त्रोतातून मिळालेल्या माहितीचा संशोधनासाठी वापर करण्यात आला आहे. तसेच दुय्यम स्त्रोताचा भाग म्हणून रेडिओ, टी.व्ही., इंटरनेट, या सारख्या दृक-श्राव्य साधनांचा वापर संशोधनासाठी केलेला आहे.

**2.3.3 तथ्य विश्लेषण :-** सबंधीत संशोधनासाठी जमविलेल्या माहितीचे व तथ्यांचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. यामध्ये प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांतून जमविलेल्या महिलाविषयीची माहितीचे एकत्रिकरण व वर्गीकरण करण्यात आले. जमविलेल्या माहितीचे विश्लेषण करणे सुलभ व्हावे यासाठी एकत्रित माहितीचे सारणीयन करून सरासरी टक्केवारीचे प्रमाण दाखविण्यात आलेले आहे. आवश्यक त्या ठिकाणी वेगवेगळया प्रकारच्या आलेखाचा वापर करण्यात आलेला आहे. जमविलेल्या माहितीचे विश्लेषण करुन शेवटी संशोधन

अभ्यासाचे निष्कर्ष मांडण्यात आलेले आहे तसेच सुचना व शिफारशी करण्यात आलेल्या आहेत.

## 2.4 नमुना निवड

**गुडे आणि हरे,**‘नमुना त्यातील नावाप्रमाणेच एका विस्तृत समूहाचा लघुप्रतिनिधी आहे.’[1]

**बोगार्डस,**‘नमुना पध्दतीत पूर्व निर्धारित योजनेप्रमाणे कोणत्याही एककाच्या एका समूहातील एक निश्चित प्रतिशत निवडणे होय.’

**श्रीमती यंग,**‘एक सांख्यिकीय नमुना म्हणजे समूहाचा किंवा समग्राचा एक निवडलेला भाग होय.’[2]

वरील व्याख्यावरून हे स्पष्ट होते की, विश्व किंवा समग्रातील एकूण एककांपैकी काही प्रतिनिधी एककांची निवड करणे म्हणजे नमुना निवड होय. नमुना निवडीचे तंत्र हे असे तंत्र आहे की, ज्यामध्ये संशोधन विषयांच्या अंतर्गत समाविष्ट संपूर्ण लोकसंख्या किंवा एककांमधून काळजीपूर्वक संपूर्ण वैशिष्टयांचे योग्य प्रतिनिधित्व करणाऱ्या एककांना निवडले जाते.

**नमुना निवड :-** प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी ‘व्यवस्थापकीय दृष्टिकोनातून नांदेड जिल्ह्यातील महिलांचा गृहिणीकडून गृहव्यवस्थापकाकडे त्या बदलाच्या भूमिकेचा व्यष्टि अभ्यास’ करत असताना नांदेड जिल्ह्यास विश्व मानून त्यातील प्रतिनिधित्वासाठी नांदेड जिह्रयातील सोळा तालुक्यापैकी - अर्धापूर, मुदखेड,उमरी, बिलोली, धर्माबाद, भोकर, नांदेड, मुखेड, माहूर, किनवट

अशा दहा तालुक्याची साधा यादृच्छिक नमुना पध्दतीनुसार निवड केली आहे. सर्वच तालुक्याचा अभ्यास करणे शक्य नसल्यामुळे काही निवडक तालुक्याचाच वेळ व पैसा याचा विचार करुन अभ्यास करण्यात आलेला आहे. प्रत्येक तालुक्यातील पाच गाव व प्रत्येक गावातील दहा गृहिणी अशा एकूण पाचशे गृहिणीची साधा यादृच्छिक पध्दतीने निवड करण्यात आली आहे. प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी नमुना निवड ही संशोधन पध्दती वापरली असून या नमुना निवड पध्दतीतील साधा यादृच्छिक नमुना (Random Sampling) पध्दतीने महिलांची निवड केलेली आहे. या पध्दतीत अभ्यासासाठी निवडलेल्या विषयाच्या संबंधित सगळयाच घटकांचा समान संधी आणि महत्व दिले जात असते असे असले तरी संशोधकाच्या मनाप्रमाणे वाटले त्या घटकाची निवड करणे असे नव्हे. विशेषत: संशोधकाच्या ग्रह इच्छेला इथे वाव मिळत नाही. म्हणजे शेवटी ज्या घटकांना नमुना निवडीत समाविष्ट होण्याची ज्या पध्दतीत समान संधीची खात्री असते त्या पध्दतीला यादृच्छिक नमुना निवड असे म्हणतात. [3]

### 2.4.1 नांदेड जिल्हयातील नमुना म्हणून निवड केलेले तालुके व महिला सदस्य

नांदेड जिल्हयात एकूण सोळा तालुके आहेत, त्यापैकी दहा तालुक्याची वेळ व पैसा याचा विचार करून संबंधीत अभ्यासासाठी सहेतुक नमुना निवड केली आहे. त्या सर्व तालुक्यातील गृहिणींचा अभ्यास करण्यात आला आहे. त्याचा तपशील पुढील सारणीत दिलेला आहे.

**सारणी क्र. 2.1**

**नांदेड जिल्हयातील नमुना म्हणून निवड केलेले तालुके व महिला दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | निवडलेल्या तालुक्याचे नाव | निवडलेल्या महिला सदस्याची संख्या |
|---|---|---|
| 1 | अर्धापूर | 50 |
| 2 | बिलोली | 50 |
| 3 | मुदखेड | 50 |
| 4 | उमरी | 50 |
| 5 | धर्माबाद | 50 |
| 6 | भोकर | 50 |
| 7 | नांदेड | 50 |
| 8 | मुखेड | 50 |
| 9 | माहूर | 50 |
| 10 | किनवट | 50 |
| | एकूण | **500** |

संदर्भ स्त्रोत :- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र.2.1 नुसार नांदेड जिल्हयातील सोळा तालुक्यापैकी दहा (63%) तालुक्याची नमुना म्हणून निवड यादृच्छिक नमुना (Randm Sampling) या पध्दतीने करण्यात आली. प्रत्येक तालुक्यातील पाच गाव व प्रत्येक गावातील दहा अशा 500 महिलांची संशोधनासाठी साधा यादृच्छिक नमुना पध्दतीने निवड केलेली आहे. प्रातिनिधीक स्वरुपात निवडलेल्या गृहिणीची माहिती प्रश्नावली द्वारे सर्वेक्षणातून एकत्रित करण्यात आली आहे. मुलाखत व महिलांशी चर्चा करून संशोधनासाठी आवश्यक असलेली माहिती

मिळविली. संशोधनासाठी प्राथमिक स्त्रोताचा व दुय्यम स्त्रोतात वर्तमानपत्रे, विविध पुस्तके, दूरदर्शन, इटरनेट, रेडिओ या साधनाचा उपयोग घेवून आवश्यक माहिती मिळविण्यात आली आहे.

संशोधन करीत असतातना शास्त्रीय पध्दातीने संशोधन करणे आवश्यक असते. प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी 'नमुना निवड' ही संशोधन पध्दती वापरली असून या नमुना पध्दतीतील साधा यादृच्छिक नमुना (Randm Sampling) या पध्दतीने गृहिणींची नमुना निवड करण्यात आली आहे.

### 2.4.2 संशोधन प्रक्रिया :-

**सांकेतिकरण, वर्गीकरण, सारणीकरण**

वरील तीन निर्देशीत संशोधनाच्या बाबी संशोधनात अतिशय महत्वाची भूमिका बजावीत असतात. त्यामुळे संशोधन प्रक्रियेत सुलभता येते. संशोधनासाठी हे तथ्य संकलन केलेले असते ते जसेच्या तसे वापरणे शक्य नसते आणि जरी वापरले तरी संशोधकाला अचूकता व शास्त्रीय अधिष्ठाण प्राप्त होते नाही. बऱ्याच विस्तृत स्वरूपाच्या बाबी थोडक्यात अचूकपणे व कमी वेळात मांडण्याचा उत्तम मार्ग ठरतात. अभ्यास विषयाचा आशय न बदलता संशोधनाच्या सर्व बाबी सुरक्षित ठेवून आराखडयाच्या चौकटीत या सर्व बाबी कार्य करीत असतात. सांकेतिकरण, वर्गीकरण, सारणीकरण या तिन्ही बाबी परस्पर पूरक व परस्परावलंबी आहेत. संशोधकाला मार्गदर्शक ठरतात.

**सांकेतिकरण :-**

तथ्य संकलनासाठी प्रश्नावली तंत्राचा वापर केला आहे. प्रश्नावलीत अनेक प्रश्न व उपप्रश्नांचा समावेश केलेला आहे. या सर्व प्रश्नांचे उत्तरदात्याकडून

अनेक पर्यायातून एका पर्यायाची निवड करण्याची सोय प्रश्नांवलीत असल्याने ही माहीती जशास तसे वापरणे शक्य झाले आहे. तथ्य संकलनाची 500 नमुना घटक संख्या असल्याने मांडणी सांकेतिकरणाशिवाय शक्य नव्हते. सांकेतिकरणाच्या प्रक्रियेनंतर त्या माहीतीचे वर्गीकरण करणे शक्य झाले.

**वर्गीकरण :-**

प्राथमिक स्त्रोतातून जमा केलेली महिलांविषयीची माहीती विस्कळीत व विस्तृत स्वरुपाची असते. या सर्व माहितीची विभागणी, वर्गीकरण, बांधणी केल्याशिवाय प्रबंधाचे विवेचन व विश्लेषणात्मक लिखाण करता येत नाही. म्हणून एकत्रित माहितीचे विभाजन केले. त्यामुळे विभागलेली व वर्गीकरण केलेली माहिती तात्काळ व स्पष्ट स्वरुपात वापरणे शक्य झाले. तसेच तथ्यांची श्रेणीरचना व तुलनात्मक संबंध तपासता आला.

**सारणीकरण :-**

सारणी म्हणजे तक्ते तयार करणे होय. संशोधनात सारणीकरण हा एक अनिवार्य भाग असतो. कुटुंबातील विविध कार्ये करण्यासाठी महिलात असलेली विविध व्यवस्थापकीय कौशल्य जाणून घेण्यासाठी महिलांची वैयक्तिक, शैक्षणिक, व्यवस्थापकीय कार्ये, नियोजन, नेतृत्व वेगवेगळया सारणीद्वारे माहितीचे विश्लेषण केले आहे. संशोधनासाठी अनुसूची किंवा इतर माध्यमातून केलेले तथ्य संकलनातील सांख्यीकीतून नव्याने सारणी तयार कराव्या लागतात. याचा अर्थ सारणीचा वापर प्राथमिक व दुय्यम स्त्रोतामधील माहितीतील तथ्यातून करता येवू शकतो. तथ्यातील आकडेवारी, विविध गट, उपगट, प्रकार, उपप्रकार, घटक, निष्कर्ष याच्यातून सारण्या, रकाने, स्तंभ,

आकृती, आलेख यासारख्या अनेक पध्दतीने स्पष्ट व थोडक्यात गोष्टींचा उल्लेख सारणीद्वारे होत असतो.

प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक त्या ठिकाणी संदर्भीय माहिती म्हणून दुय्यम स्त्रोतातील काही सारणींचा अंतर्भाव केला आहे. जास्तीत जास्त प्राथमिक स्त्रोतातून जमा केलेल्या तथ्यांतून सारण्या तयार केल्या आहेत. यामुळे वेळ, श्रम, पैसा, याची तर बचत झाली आधुनिक संगणक यंत्राचा वापर केल्यामुळे सारणीत अचूक माहिती मांडण्यात आली. सारणीमुळे विविध घटकातील साम्य व भेद तपासणे शक्य झाले. संक्षिप्तरित्या अनेक मोठया घटकाच्या व्याप्तीचे स्वरूप लक्षात घेणे सोईचे झाले. एकंदरीत संशोधनाचा संपूर्ण आराखडाच सारण्यांवर आधारलेला आहे त्यामुळे संशोधनात सारणीमुळे संशोधनाचे कार्य सुलभ झाले व अचूक निष्कर्ष काढण्यास मदत झाली.

## 2.5 भाग ब - संशोधन साहित्याचा आढावा ( Review of Literature)

कोणतेही संशोधन कार्य करत असतांना त्या विषयी मागील झालेल्या संशोधनाचा अभ्यास करणे आवश्यक असते. कारण मागील संशोधन कोणत्या दृष्टिकोनातून केले आहे. त्या संशोधनातून कोणते निष्कर्ष मिळाले, मागील संशोधनातून समाजाला कोणत्या प्रकारचे फायदे मिळाले आहेत. संशोधनामुळे समाजाचा व समाजातील महिलांचा विकास होण्यास काय करावे लागेल, यासाठी संशोधकाला योग्य ते मार्गदर्शन मिळते. तसेच त्यासाठीचे नियोजन करता येते व संशोधनाचे निश्चित केलेले उद्दिष्ट साधता येतात. प्रस्तुत प्रकरणात महिलांचे कुटुंबातील कार्याविषयी, कार्याच्या व्यवस्थापनाविषयी विविध अभ्यासकांचे व महान विचारवंत यांनी जे अध्ययन केले त्यांचा आढावा घेण्यात आला आहे.

**2.6 मीरा देसाई व मैत्रेयी कृष्णराज [1] (1987) %** 1995 साली संयुक्त राष्ट्र संघटनेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या मानवी विकास विषयक अहवालानुसार एकूण कामाच्या तासानूसार करण्यात आलेल्या स्त्री पुरूष कामाच्या तासिकेच्या मूल्यामापनानुसार विकसनशील देशात पुरूषांचा वाटा 47 टक्के आहे, तर स्त्रियांचा वाटा 53 टक्के आहे. विकसित राष्ट्रांत हेच प्रमाण 50.49 टक्के व 49.51 टक्के आहे. याशिवाय स्त्रियांची 66 टक्के कामे ही राष्ट्रीय उत्पादनांशी निगडीत नसलेली आहेत. यात स्त्रियांकडून केले जाणारे घरकाम, बाजारहट, पाणी व लाकुडफाटा गोळा करणे या सारख्या दृश्य कामाबरोबर कुटुंबातील लोकांची काळजी घेणे, एकत्र ठेवणे, संपत्ती जपुन वापरणे, प्रेम , आपुलकी, जिव्हाळा, या सारख्या गोष्टीची वृध्दी करणे, या कामाचे मूल्य नोंदविता येत नाही. मात्र स्त्रियांच्या अशा कामामुळे मानवी समाजात प्रेम, शांतता, आपुलकी टिकून राहिलेले आहे. यासारख्या भानामुळेच मानवी जीवन हे आनंदाचे व सुखाचे बनलेले आहे असे त्या मानतात.

**2.7 अर्जुन वाय पनगन्नावार [2] (2001):** यांनी 'महिला स्वयंसहायता समूह कार्यकम आणि ग्रामीण विकास एक अभ्यास', या शिर्षकाखाली एक शोध निबंध लिहीला आहे. महिला बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे जीवनमान व राहनीमान उंचावत आहे असे मत मांडले आहे.

**2.8 प्रा. त्रिवेणी फरकाडे, सौ. सुलभा गोंगे [3] (2002):** यांनी आपल्या 'गृहविज्ञान विस्तार', या पुस्तकात त्यांनी 'घरांबद्दलच्या संकल्पना भिन्न काळात भिन्न देशात वेगवेगळया दिसतात. जसे भारतीय घराची संकल्पना ही पाश्चिमात्य लोकांच्या कुटुंबापेक्षा वेगळी आहे. जसजसे मानवाचे विचार अनुभवाचा विकास झाला तसतसा घरासंबधीच्या धोरणेत बदल होत गेलेला दिसून येतो. भारतीय

तत्वज्ञानाप्रमाणे स्त्री\गृह हे दोन वेगवेगळे नाहीत व्यक्ती विकासात, कुटुंब विकासात स्त्रीचा महत्वपूर्ण वाटा आहे.' असे  मत मांडले आहे.

**2.9 महात्मा गांधी [4] (2002)**: म. गांधी यांनी, 'गृहविज्ञान विस्तार' या पुस्तकात स्त्री शिक्षण व समाजवाद याविषयी स्त्री संबंधी आपले विचार व्यक्त केले. 'मी उपयुक्त स्त्री शिक्षणावर विश्वास ठेवतो, भारताचे भविष्य स्त्रीच्या हातात आहे. एखादयाच्या हदयाला कुशलतेने प्रभावित करण्याचे कार्य स्त्री शिवाय कुणीच करू शकत नाही. '

**2.10 प्रा. त्रिवेणी फरकाडे, सौ. सुलभा गोंगे [5] (2002):** 'गृहविज्ञान विस्तार' या पुस्तकात गृहव्यवस्थापनाबद्दल माहिती सांगितली आहे. 'आपल्या जवळ असलेली मानवी आणि भौतिक साधनसंपत्तीचा योग्य उपयोग करून आपले जीवनध्येय साकार करावयाची असतात. आपल्या जवळ असलेल्या साधनसंपत्तीचा उपयोग जास्तीत जास्त निर्धारित उद्दिष्टे, ध्येय गाठण्याकरिता झाल्यास संतोषाची भावना अधिक निर्माण हाते. समाधानाची भावना ही यशाच्या वाटेकडे वाटचाल करणारी बाब आहे. कारण असंतुष्टपणामुळे नैराश्य, व्देष, या बाबी निर्माण होतात, या बाबी विकासात अडथळे निर्माण करणाऱ्या आहेत.

प्राचीन भारतीय महर्षि मनू 'आचारसंहितेत' नमूद  करतात  की, चांगल्या गृहिणीद्वारे नेहमी  चांगल्याच कार्यांना प्रोत्साहन दिल्या जाणे  हे चांगल घर नेहमी सुखी समाधानी राहण्याकरिता भावी गृहिणीला आपला धर्म, कला,  विज्ञान घराची सुरक्षा, पाककला, शिवणकला, भरतकाम, स्वच्छता तसेच नैतिक, माध्यमिक जीवनाचे प्रशिक्षण दिल्या जाते.

चांगले व वाईट व्यक्तिला घडविण्याचे कार्य कुटुंबातूच होते. ‘मानवी जीवनाची जडणघडण कुटुंबातच प्रथमत: चांगली व्हावयास पाहिजे. कुटुंब ही भावी जीवनाची पाठशाळा आहे हे पूर्णसत्य मानवी वर्तनातून प्रगट व्हावयास लागते. योग्य मार्गदर्शन नसलेली मुले ही वाईट प्रवृत्तीची निघतात असा अभ्यासकांचा दुजोरा आहे.’ त्यांनी असे मत मांडले.

**2.11 रत्नाकर गायकवाड [6] (2006)** : यांनी ^यशमंथन*च्या स्वयंसहायता गट विशेषंकासाठी प्रस्तावना केली असून त्यात त्यांनी सध्या भारतात ही चळवळ एका महत्वपूर्ण वळणावर पाहेचली आहे की ती कोणत्याही बाजूला झेप घेवू शकते. ही चळवळ महिलांच्या स्वाभिमानाला जागे करते व या जागृत स्वाभिमानाचा उपयोग महिला त्याच्या उन्नतीसाठी करुन घेत आहेत असे विचार मांडले आहेत.

**2.12 डॉ. सुधा कोठारी निरूपमा देशपांडे [7] (2006)** : यांनी लिहीलेल्या ^स्वयंसहायता बचत गट : अभिलेख्याची गरज* या शिर्षकाखाली बचतगटविषयी एक सविस्तर लेख लिहीला असून तो ^यशमंथन* विशेषांकातून प्रसिध्द करण्यात आला. या लेखात त्यांनी बचत गटातील महिलांनी सर्वच क्षेत्रात घेतलेली भरारी ही फार मोठी प्रक्रिया आहे. या प्रक्रियाची अत्यंत आवश्यकता आहे. यामुळे महिलांना प्रेरणा मिळतेच परंतू महिलांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होते.असे त्यांनी लेखात मांडले आहे.

**2.13 प्रा. प्रदिप दंदे [8] (2006) :** यांनी लिहिलेल्या ^महिला बचत गट एक लोकचळवळ*, या शिर्षकाखाली बचतगटविषयी एक सविस्तर लेख लिहीला असून तो यशमंथन स्वयंसहायता गट विशेषांकातून प्रसिध्द करण्यात आला

आहे. या लेखात त्यांनी अल्प शिक्षित महिलांनी विविध उद्योग सुरू केल्यामुळे अर्थिकदृष्टया स्वावलंबी झाल्या आहेत. तसेच सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक कार्यात सहभागी होत आहेत. बचतगट ही चळवळ अर्थिकदृष्टया सक्षम करणारी योजना न राहता ती लोकशाहीचा पाया भक्कम करणारी लोकचळवळ बनली आहे. असे मत मांडले आहे.

**2.14 सुरेश डेरे** [9] **(एप्रिल 2006) :** यांनी लिहीलेल्या ^गटाच्या महिलांचे अर्थिक व सामाजिक स्थित्यंतर एक मूल्यमापन*, या शिर्षकाखाली एक सविस्तर लेख लिहीला असून तो यशमंथन स्वयंसहायता गट विशेषांकातून प्रसिध्द झाला आहे. या लेखात त्यानी महिलांना व्यावहारिक ज्ञान, बॅकेची माहिती, घरातील स्थितीत बदल, शैक्षणिक परिर्वतन घडून आले, सामाजिक परिवर्तन होवून महिलांना समाजात व कुटुंबात मानाचे स्थान मिळाले असे मत मांडले आहे.

**2.15 ठाकरे गुलाबराव** [10] **(2006) :** याचे ^बचत गट एक वरदान*, या पुस्तकात अतिशय सोप्या शब्दात माहिती देण्यात आली आहे. त म्हणतात स्वतःच स्वतःला मदत करणे आपल्यावर संकट आल्यावर आपली मदत आपणच कशी करावी हे या बचत गटामार्फत केले जाते. बचत गटामुळे समाजाचा व समाजातील महिलाचा विकास होत असतो हे बचत गट महिलांना एक वरदान ठरत आहे. असे मत मांडले आहे.

**2.16 मा.सुप्रियाताई सुळे** [11] **(2007)** : यांनी ^बचत गट हे समाजबदलाचे महत्वाचे साधन*, या शिर्षकाखाली महिला बचत गटाविषयी आपले विचार मांडले असून ते लोकराज्य 2007 या मासिकात प्रसिध्द करण्यात आले आहे. त्या म्हणतात राज्यभर विस्तारलेल्या बचतगटाच्या चळवळीकडे मी केवळ

अर्थिक स्वावलंबनाचा मार्ग म्हणून बघत नाही तर समाज बदलाच्या टप्यातील ते महत्वाचे साधन आहे. बचत गटाच्या माध्यमातून शिक्षण आणि आरोग्याच्या प्रश्नांवर महिलांना जागृत करण्याचे काम आम्ही चव्हाण सेंटरच्या माध्यमातून करतोय. महिलाचा सहभाग केवळ पोषक आहारापूरता मर्यादीत न राहता शिक्षणाच्या दर्जावर या महिलानी लक्ष ठेवणे अपेक्षित आहे. असे मत मांडले.

**2.17 स्वाती कर्वे [12] (2007)** : ^स्त्री विकासाच्या पाऊलखुणा*, या पुस्तकात त्यांनी स्त्रीयांविषयी सांगितले आहे. स्त्रीया अत्यंत सोशीक मनोवृत्तीच्या असतात. आपली सुखःदुखे मनात ठेवणाऱ्या व कितीही प्रेमळ व सहानुभूतीपूर्ण वागणाऱ्या व्यक्तिना सुध्दा सांगायला तयार नसतात. सकाळपासून संध्याकाळपर्यन्त कुटुंबातील माणसाच्या सेवेत मग्न असतात. कुटुंबातील कार्य म्हणजे त्यांचा फुल टाईम जॉब असतो. असे मानून कार्य करणाऱ्या असतात. असे मत मांडले.

**2.18 प्राची जांभेकर [13] (2007)** : यांनी लिहीलेल्या ^समृध्दी आली हो*,या शिर्षकाखाली बचत गटाविषयी ^लोकराज्य* या मासिकातून प्रसिध्द करण्यात आला आहे. बचत गटाच्या माध्यमातून महिलामध्ये जाणीव जागृती निर्माण होत आहे. समाजात त्याच्याकडे आदराने व अभिमानाने पाहिले जात आहे. त्यांच्या कार्याचा समाजाला व राष्ट्राला फायदा होणार आहे. महिला मुख्य प्रवाहात आणण्याचे मोठे कार्य बचतगटांनी केले आहे. असे विचार मांडले आहेत.

**2.19 प्रगती बाणखेले [14] (2007)** :यांनी लिहीलेल्या ^आत्मसन्मानाची पाऊलवाट*, या शिर्षकाखाली ^स्वयंसहाय्यता बचत गट* विषयाचा लेख

लोकराज्य डिसेबर 2007  च्या नियतकालिकात प्रसिध्द करण्यात आला असून त्यात महिला स्वयंसहायता बचत गट हे एक सामाजिक परिवर्तनाचे महत्वाचे साधन आहे. असे विचार मांडण्यात आले आहे.

**2.20 मा. हर्षवर्धन पाटील [15] (मार्च 2008)** :यांनी ^येणारा काळ महिलांचा*,या शिर्षकाखाली आपले विचार मांडले असून ते ^लोकराज्य*, मार्च 2008 या मासिकातून प्रसिध्द करण्यात आले आहेत. या लेखात त्यांनी महिला दिनांच्या निम्मिताने आपले विचार मांडले की, गावातील अनेक समस्या महिला सोडवित आहेत, गावात होणाऱ्या अन्यायाविरूध्द वाचा फोडण्यासाठी सर्व बचत गटातील महिला एकत्र येताना दिसत आहेत. गावाच्या विकासाठी प्रयत्न करीत आहेत. येणारा काळ हा महिलांचा असेल असे विचार त्यांनी मांडले आहेत.

**2.21 कोमल.के आणि के, व्हि. आयन्न व शिक्रण्णागोस्वामी [16] (2007-2008)**: यांनी म्हैसूर जिल्हयातील बचत गटाचा अभ्यास केला असून त्यांच्या मते महिलांचा सामाजिक व आर्थिक विकासात महत्वाचे योगदान लाभत आहेत. महिलांमध्ये आत्मविश्वास, स्वावलंबन, समानता, सहकार्य एकोप्याची भावना वाढीस लागत आहे. त्यांच्यात जाणिवजागृती निर्माण होवून त्या समाजप्रबोधनाचे कार्य करीत आहेत. असे त्यांनी मत मांडले आहे.

**2.22 प्रा. हनुमंत सपकाळ [17] (2008) :** यांनी लिहिलेल्या ^सामर्थ्याची जाणीव करून देण्याची गरज*, या शिर्षकाखाली या लेखात त्यांनी महिला गटांनी ग्रामीण महिलांना उत्कर्षाचा मार्ग दाखवून दिला आहे. असा उल्लेख केला

आहे. या माध्यमांतून ग्रामीण भारताचे चित्र बदलण्याची शक्ती निश्चित बचत गटातील महिलांमध्ये आहे. असे मत मांडले आहे.

**2.23 मा. विलासराव देशमुख** [18] **(2008)**: यांनी ‘महिलाच्या आर्थिक सबलीकरणासाठी*, या शिर्षकाखाली महिला गटाविषयी सविस्तर विचार मांडले असून ते ‘लोकराज्य* मार्च 2008 या मासिकात प्रसिध्द करण्यात आले आहेत. या लेखात ते म्हणतात, महिलांकडे दुर्लक्ष करून कोणताही देश प्रगती करू शकत नाही. महिलांना मानाचे स्थान मिळावे तसेच त्यांचा सर्वागिण विकास व्हावा या उद्येशाने राज्याने महिला धोरण तयार केले. जो पर्यत महिला आर्थिक दृष्टया सक्षम होत नाहीत. तोपर्यंत घरात, समाजात, कुटुंबात त्याचे अस्तित्व जाणवणार नाही. ही बाब लक्षात घेवून त्यांचे आर्थिक सबलीकरण करण्यास राज्यशासन प्राधान्य देत नाही. असे सविस्तर विचार मांडले आहेत.

**2.24 माधवी कुंटे** [19] **(2009)%** ‘स्त्री सूक्त’ या पुस्तकात विविध समाजसुधारकांनी स्त्रीयांसाठी कार्य केले आहे याची माहिती सांगितली आहे. ‘महाराष्ट्रात माहत्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, महर्षि कर्वे इत्यादीच्या प्रचंड परिश्रमाने स्त्रीशिक्षणाची मूहुर्तमेढ रोवली गेली आणि जागतिक युध्दामुळे अर्थिक मंदी आल्यावर कुटुंबाला अर्थिक मदत हवी म्हणून स्त्रिया नोकरीसाठी बाहेर पडल्या, 1975 मेक्सिकोमध्ये महिली जागतिक महिला परिषद झाली. त्यावेळी स्त्रियांसाठी अनेक पातळयावर कामे करण्याचे निर्णय झाले.’

या पुस्तकांत महिलांच्या गुणधर्माविषयी माहिती सांगितली आहे. स्त्रि ही खेडयात राहणारी असो शहरातील गृहिणी असो कि नौकरी, व्यापार, उद्योग

करणारी असो, अशिक्षित असो वा सुशिक्षित असो. सर्व स्त्रियांच्यात एक समान गुणधर्म आढळतो. प्रत्येक स्त्री तिच्या कुटुंबाशी, घराशी, मुलांबाळाशी अतूटपणे बांधली गेलेली असते. निसर्गानेच तिला मातृत्वगुण त्याचे भरण पोषण, तिचा स्वभावच कुटुंब केंद्री असतो असे मत प्रतिपादन केले आहे.

**2.25 सुषमा बावळे [20] (2009):** यांनी ^उद्योग जगतातील ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण*, या शिर्षकाखाली कर्नाटकातील बेंगलोर व बेलगाम या जिल्हयांचा अभ्यास केला असून महिलांमध्ये उद्योगवृत्ती निर्माण केली जात असून महिलांच्या आर्थिक व सामाजिक समस्या दूर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. महिलांचा स्वयंविकास होत आहे असे मत त्यांनी अभ्यासातून व्यक्त केले आहे.

**2.26 माधवी कुंटे [21] (2009)** : ^स्त्री सूक्त*,या पुस्तकात त्यांनी महिलांच्या कार्याची माहिती सांगितली आहे. मुलांवर संस्कार करण्याची जबाबदरी आजही प्रामुख्याने आईचीच असते. स्त्री कामावर जात असेल तर तिचे मूल आई व सासू सांभाळतात. पर्यायाने ही जबाबदारी स्त्रियाच पार पाडतात. बालवाडया, पाळणाघरे, संस्कारकेद्रे, यांच्या संचालिका स्त्रियाच असतात. मुलांना शाळेत घालणे, अभ्यास करवून घेणे, क्लासची चौकशी, ट्यूशन, पालकसभांना उपस्थिती लावणे. या सगळयाच गोष्टी महिलांच करतात. मुलांच्या व्यक्तिमत्व विकासात पोषक गोष्टी उपलब्ध करणे या सर्व गोष्टी बहुसंख्य कुटुंबामधून स्त्रियाच करताना आढळतात.

**2.27 डॉ. मुलानी [22] (2009)** : यांनी लिहिलेल्या ‘महाराष्ट्रातील स्वयंसहायता बचत गट सद्यः स्थिती*, या शिर्षकाखाली एक अभ्यासपूर्ण लेख लिहीला

असून तो यशदाच्या यशमंथन या नियतकालिकामधून प्रसिध्द झाला आहे. बचतगटाची चळवळ महाराष्ट्रात जोमाने सुरू आहे. या चळवळीच्या माध्यमातून महिलांचा सर्वागीण विकासाला चालना मिळत आहे. असे विचार मांडले आहेत.

**2.28 माधवी कुंटे [23] (2009)** : ^स्त्री सूक्त*,या पुस्तकात त्यांनी महिलांच्या शैक्षणिक स्थितीची माहिती सांगितली आहे. स्त्री शिकते आहे बाहेरच्या जगात महत्वाची पदे भूषवते आहे. तिला अनेक क्षेत्रे खुली झाली आहेत. उच्चतम क्षमता दाखवून तिने आर्मी, नेव्ही, पोलीस फोर्समध्येही प्रवेश मिळविला आहे. तरी अजून तिच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या फारशा कमी झालेल्या नाहीत. उलट जबाबदारीत वाढ झालेली आहे. असे मत मांडलेले आहे.

**2.29 प्रा.शिन्दे नारायण [24] (2010)**: यांनी “बीड जिल्हयातील महिला बचत गट एक दृष्टिक्षेप” या शिर्षकाखाली ‘शोध प्रंबध’ लिहिला असून तो ‘रिसर्च लिंक’ जुलै 2010 या राष्ट्रीय शोध जर्नल मधुन प्रसिध्द करण्यात आला आहे. बचत गटाच्या माध्यमातून महिलांची अर्थिक, सामाजिक, शैक्षणिक प्रगती

झाल्याचे दिसून येते. महिलांचा कौटुबिक दर्जा व सामाजिक दर्जा, कुटुंबाचे उत्पन्न व राष्ट्रांचे उत्पन्न वाढण्यास सहाय्य होतांना दिसत आहे. असे मत त्यांनी मांडले आहे.

**2.30 प्रा.डॉ. शंकर अंभोरे व प्रा.डॉ. पल्लवी भावसार [25] (जुलै 2010)** : यांनी, महिलांच्या सक्षमीकरणात महिला बचत गटाचे योगदान या शिर्षकाखाली शोध निबंध लिहीला असून तो रिसर्च लिंक जुलै 2010 या जर्नलमधून प्रसिध्द करण्यात आला आहे. महिलांच्या आत्मविश्वासात वाढ, त्या स्वावलंबी बनत

आहेत, महिलांमध्ये जाणिवजागृती निर्माण होत आहे. त्यामुळे त्या समाजजागृतीचे कार्य करण्यास पुढे येते आहेत. असे मत या शोधप्रबंधनात मांडले आहे.

**2.31 श्री. एस.व्ही. कुलकर्णी [26] (2010) :** यांनी लिहीलेल्या ^बचत गटातून स्वयंनिर्भयता*, या शिर्षकाखाली लेख लिहीला असून तो ^उद्योजक*, फेब्रुवारी 2010 या मासिकातून प्रसिध्द करण्यात आला आहे. या लेखात बचतगटामुळे महिलांची अर्थिक प्रगती होत आहे. या प्रगतीमुळे महिलांमध्ये एक प्रकारचा आत्मविश्वास वाढत आहे. असे विश्लेषण या लेखात केले आहे.

**2.32 प्रा. व्हि. जे वराडे आणि डॉ. एस.पी. जाधव [27] (2010):** यांनी महिलांच्या अर्थिक विकासात महिला बचत गटाचे योगदान या शिर्षकाखाली संशोधन लेख लिहीला असून तो रिसर्च लिंक जुलै 2010 या शोध जर्नलमधून प्रसिध्द करण्यात आला आहे. या शोध निंबधात त्यांनी महिला बचत गटामुळे महिलांमध्ये बचतीची सवय निर्माण झाली. कुटुंबातील महिलांचा दर्जा सुधारणे, महिलांना संघटीत करून स्वअस्तित्वाची जाणीव करून देणे त्याच्यात आदरभाव, आत्मसन्माची जाणीव जागृती करणे, सामाजिक, अर्थिक कार्यात सहभाग वाढविणे.उद्योजक वृत्ती वाढीस लावण्याचे कार्य बचतगटाच्या माध्यमातून होत आहे. कुटुंबाचा, गावाचा व पर्यायाने देशाचा विकासासाठी बचत गट महत्वाचे योगदान करीत आहेत, असे मत व्यक्त केले आहे.

**2.33 श्रीमती शंकुतला थोरात [28] (2011)** : माविमा संचालक महिला दिनाच्या निमित्त ‘माविम सांगाती*, या विशेषाकांत शुभ संदेश देताना सांगतात, ग्रामीण भागातील महिलांच्या जीवनाला रूढी, परंपरा, संस्कृती व कुटुंबातील दुय्यम

दर्जा, अखंड परिश्रम इ. अनेक कंगोरे आहेत. बचत गटाच्या माध्यमातून संघटीत होवून त्यांना संघर्षमय व कष्टमय जीवनाला एक दिशा देता येते. नव्या परिवर्तनाच्या आशा मिळाल्या आहेत. अशी अशा त्यांनी व्यक्त केली आहे.

**2.34 डॉ. स्मीता मेहेत्रे [29] (2011)** : ^भारतीय स्त्री आणि मानवाधिकार*, या पुस्तकात डॉ. स्मीता मेहत्रे यांनी महिलांच्या वेगवेगळया भूमिकेविषयीची माहिती सांगितली आहे. प्रत्येक व्यक्तिची समाजातील भूमिका वेगवगळी असते. उदा. आई, बहिण, मुलगी, शिक्षिका इ. प्रत्येक भूमिकेचा आपला विशिष्ट दर्जा असतो. प्रत्येक समाजाची काही मूल्ये व मानदंड असतात. त्याप्रमाणे हा दर्जा ठरत असतो. लिंटनच्या मते, ^प्रत्येक व्यक्ति समाजाने नेमून दिलेला दर्जा धारण करते ज्याचा दुसऱ्याच्या दर्जाशी परस्पर संबंध असतो.जेव्हा ती व्यक्ती आपले हक्क व कर्तव्य ते ज्या दर्जाशी संबंधित आहेत ते आचरणात आणते तेव्हा ती व्यक्ति आपली भूमिका पार पाडते.*

**2.35 मा. फौजिया खान [30] (मार्च 2011)** : महिला व बाल विकास राज्यमंत्री म.रा. यांनी महिला दिनांच्या निमित्ताने महिलांना दिलेल्या शुभसंदेशात लिहीतात आज बचतगटातील महिला केवळ स्वत: पुरता विचार करीत नसून गावातील वेगवेगळे सामाजिक प्रश्नाचा सजगतेने विचार करीत आहे, असे मत मांडले आहे.

**2.36 प्रा. गोपाळ कोल्हे आणि प्रा. डॉ. अनिल सरोदे [31] (जुलै 2011)** : यांनी ^ग्रामीण महिला बचत गट विकासाचे प्रभावी माध्यम*, या शिर्षकाखाली जळगाव जिल्हयातील बचत गटांवर शोधनिबंध लिहीला असून तो ‘Entire

Reseach' या जर्नलमधून प्रसिध्द झाला आहे. या शोधनिंबधात त्यांनी बचत गटातील सदस्यांचा व गटाचा अभ्यास केला असून महिलांमध्ये आत्मविश्वास वाढत असून त्यांच्या सामाजिक स्थितीत फरक दिसून येत असल्याचे मत मांडले आहे.

**2.37 डॉ. लीना कांडलकर [32] (2012)** : ^कौटुबिक संसाधनाची संकल्पना*, या पुस्तकात त्यांनी महिलांच्या कौटुंबिक तसेच इतर कार्याविषयीची माहिती सांगितली आहे. कुटुंबाचा जीवनस्तर उंचावणे व वाढत्या महागाईला कुटुंबातील सदस्याच्या गरजा पूर्ण करण्याकरिता कुटुंब प्रमुखाला अर्थिक सहकार्य म्हणून स्त्री अर्थाजन करण्यासाठी घराबाहेर पडली आहे. बऱ्याचशा स्त्रिया स्वत:चे करिअर बनविण्याच्या महत्वाकांक्षेमुळे नोकरी किंवा व्यवसायात उतरल्या आहेत तर काही स्त्रियां आपल्या फावल्या वेळेचा उपयोग समाजाकरिता व्हावा म्हणून समाजकार्य करताना आढळून आलेल्या दिसतात. असे मत मांडले.

**2.38 ज.श. आपटे, पुष्पा रोडे [33] (2012)** : यांनी ^वैज्ञानिक शोध - गृहिणीला वरदान*] या शिर्षकाखाली त्यांनी वैज्ञानिक शोधामुळे महिलांची कष्टाची आणि वेळखावू कामे कमी झालेली आहेत. महिलांचा विकास आणि प्रगतित या शोधामुळे अमुलाग्र बदल झाला आहे. असे मत मांडले आहे.

स्वयंपाकघरात पूर्वी स्वयंपाक करण्यासाठी चुलीचा वापर करीत असत. चुल पेटवणे म्हणजे महादिव्यच असायच. नाकातोंडात धूर जायचा, डोळयातून पाण्याच्या धारा वाहायच्या. त्यात सुधारण झाली, निर्धूर चुली आल्या, कोळशाच्या शेगडया आल्या, स्टोव्ह, गॅसच्या शेगडया आल्या त्यामुळे त्रास

कमी झाला. उदा. पिठाच्या गिरण्या, मिक्सर, प्रेशर कुकर, कपडे धुण्याची वॉशिंग मशीन इ. घरकामातले शारीरिक श्रम कमी झाल्यामुळे त्या कामाला लागणारा वेळ वाचतो. त्यामुळे इतर कामासाठी वेळ काढणे शक्य झाले आहे. असे मत अभ्यासातून मांडले आहे.

**2.39 डॉ. लीना कांडलकर [34] (2012)** : ^कौटुबिक संसाधनाची संकल्पना*, या पुस्तकात त्यांनी महिलांच्या कौटुंबिक कार्यात नियोजन व नियत्रंणाचे महत्व सांगितले आहे. सर्वसाधारणपणे घरात करण्यात येणाऱ्या व्यवस्थापनामध्ये नियोजनकर्ता व नियत्रंण करणारी म्हणजेच प्रत्यक्ष कार्य करणारी व्यक्ति म्हणजे गृहिणी असते. योग्य नियोजनामुळे कोणतेही काम अर्धवट स्थितीमध्ये सोडण्याची वेळ येत नाही. नियोजन करताना उपलब्ध साधनसंपत्ती कुटुंबातील सदस्याच्या गरजा व मागणी, कुटुंबाचे ध्येय व मूल्ये यांचा विचार करून त्यावर योग्य निर्णय घ्यावे लागतात. कुटुंबाचे ध्येय, उद्दिष्टे आणि नियोजन परस्परपूरक असतात. ध्येयाला अनुसरूनच नियोजन गृहिणीला करावे लागते. ज्ञान, अनुभव आणि निरीक्षण यामुळे योग्य नियत्रंण होण्यास मदत होते. उदा. गृहिणी कामाचे नियोजन व कार्य दोन्ही स्वतःच करील परंतु जेव्हा स्त्री नोकरी किंवा व्यवसाय करणारी असेल तर योजना आखून प्रत्यक्ष कार्य मात्र मोलकरीण, घरातील सदस्य यांच्याकडून करावे लागते.

**2.40 ज.श. आपटे, पुष्पा रोडे [35] (2012)**: यांनी 'भारतातील महिला विकासाची वाटचाल' या पुस्तकांत स्त्रियांच्या कुटुंबातील कष्टांचे वर्णन केले आहे. स्त्रियांचे शारीरिक कष्ट पुरुषांच्या तुलनेने जास्त असूनही तिची मिळकत मात्र पुरुषापेक्षा कमी असते. घरकामातील श्रमाचे अर्थिक श्रमात गणना होत नाही. स्त्रिया जगातील श्रम करणारी मानवी शक्ती निर्माण करतात. पण त्यांचे काम

श्रमात गणले जात नाही. असे मत त्या मांडतात. त्याच्यामतानुसार विकास म्हणजे जीवन राहणीमान सुधारणे, गरीबीचे उच्चाटन करणे, पात्रतेप्रमाणे काम मिळणे, सामाजिक असमानता नष्ट करायची असेल तर त्याची सुरूवात स्त्रियांपासूनच झाली पाहिजे. असे मत मांडले.

**2.41 डॉ. लीना कांडलकर [36] (2012)** : ^कौटुबिक संसाधनाची संकल्पना*, या पुस्तकात त्यांनी गृहिणी  आपले जीवनस्तर उंचावण्याचा प्रयत्न करीत असते. प्रत्येक कुटुंबाचा राहणीमानाचा एक विशिष्ट दर्जा असतो. राहणीमानाचा दर्जा व कुटुंबाचे उत्पन्न याचा परस्पर संबंध आहे. कुटुंबातील सदस्य संख्या, त्याचे वय, व्यवसाय, कुटुंबाची उद्यिष्टये, उपलब्ध साधन याचा कुटुंबाच्या जीवनस्तरावर परिणाम होतो. समाजामध्ये काही कुटुंबे साध्या पध्दतीने राहताना दिसतात. प्रत्येक जण स्वत:चा राहणीमानाचा दर्जा प्रयत्नपूर्वक उंचावताना दिसतात. असे मत मांडले आहे.

**2.43 (आय पी यू) [38]** (2014) :आंतर संसदीय संघ जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येच्या आयपीयूने प्रसिध्द केलेल्या आकडेवारीनुसार 2013 मध्ये झालेल्या संसदीय निवडणूक संसदेत पोहचलेल्या माहिलांचे प्रमाण 1.5 वाढले आहे. एका आंतरराष्टीय संस्थेने संसदेतील महिला प्रतिनिधीच्या संख्येवरून 189 देशाची यादी तयार केली असून यात भारत 111 व्या स्थानावर आहे. भारतीय संसदेतील महिलांच्या प्रमाणावरून भारताला 111 व्या स्थानी ठेवण्यात आले आहे. 545 सदस्य संख्या असलेल्या भारतीय लोकसभेत केवळ 62 महिला आहेत. हे प्रमाण 11.4 % आहे. तर 245 सदस्य संख्या असलेल्या राज्यसभेत 28 महिला आहेत. हे प्रमाण 11.4 % आहे. महिलांनी संसदेही सहभाग नोंदविला आहे.

**2.43 (ओईसीडी)** [37] (2013) : ऑर्गनायजेशन फॉर इकॉनॉमिक्स को-ऑपरेशन ॲण्ड डेव्हलपमेंट या संयुक्त राष्ट्र संघटनेशी संलग्न संस्थेने आंतरराष्ट्रीय महिला दिनांच्या अनुषंगाने जारी केलेल्या एका सर्वेक्षणानुसार, नियमित घरकामासाठी भारतीय पुरूष दिवसभरात सरासरी 19 मिनिटे इतका वेळ देतात. या निकषावर भारताचा समावेश खालच्या क्रमांकावर गेला आहे. या यादीत जपान, कोरिया आणि चीन या अन्य तीन आशियाई देशांतील पुरुषांचा क्रमांकही खालच्या पातळीवरच आहे. स्नोव्हेनियामध्ये पुरूष सर्वाधिक म्हणजे दिवसभरात सरासरी 114 मिनिटे इतका वेळ नियमित घरकामासाठी (विनामोबदला) देतात. यानंतर डेन्मार्क आणि आस्ट्रेलिया या देशांचा क्रमांक लागतो. (स्लोव्हेनिया- 114, फ्रान्स- 98, आस्ट्रेलिया- 93, जर्मनी- 90, अमेरिका- 82, स्पेन- 76,ब्रिटन- 66, चीन- 48, जपान-24, भारत-19.)

गृहिणी आपल्या कुटुंबाकरिता अथक परिश्रम घेवून कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न करते. जास्तीत जास्त वेळ महिलांचा कुटुंबाच्या कार्यासाठी खर्च होत असतो. आंतरराष्ट्रीय महिला दिनांच्या अनुषंगाने केलेल्या ओईसीडी सर्वेक्षणानुसार विविध देशातील पुरूष घरकामासाठी किती दिवसभरातील वेळ देतात याची माहिती वरील सारणीवरून स्पष्ट होते. जगातील महिलांचा जास्तीत जास्त वेळ हा घरकामासाठी खर्च होत असतो. कटुंबाच्या हितासाठी, सुखासाठी नेहमी कार्य करीत असतात. हे काम त्या विनामोबदला करत असतात. आजूनही आपल्या पुरूषप्रधान संस्कृतीमध्ये अनेक घरामध्ये स्वयंपाक, घरकाम, आणि मुलांचे, घरातील श्रेष्ठ नागरिकांचे संगोपन ही जबाबदारी मुख्यत्वे स्त्री पार पाडीत असताना दिसून येते. जगातील महिलांचा जास्तीत जास्त वेळ हा घरकामासाठी खर्च होत असतो.

कटुंबाच्या हितासाठी, सुखासाठी नेहमी कार्य करीत असतात. हे काम त्या विनामोबदला करत असतात.

**संदर्भ :-**

**भाग अ -**

1. माधवी कुंटे, 'स्त्रीसूक्त',डायमंड पब्लिकेशन्स पुणे, 2009 पृ.क्र. 15.
2. ज. शं. आपटे, पुष्पा रोडे, 'भारतातील महिला विकासाची वाटचाल', डायमंड पब्लिकेशन्स पुणे, 2012 पृ.क्र. 51.
3. प्रा. त्रिवेणी फरकांडे, सौ. सुलभा गोगे, 'गृहविज्ञान विस्तार', विद्या प्रकाशन नागपूर. 2002 पृ.क्र. 15 .

**भाग ब -**

1. मीरा देसाई व मैत्रेयी कृष्णराज, वुमन अण्ड सासायटी इन इंडिया दिल्ली, अजिंठा पब्लीकेशन 1987 पृ.क्र. 40.
2. अर्जुन वाय पनगन्नावार, 'साऊथ ईकॉनॉमिष्ट' Vol-49, जुलै-2001,पृ.क्र. 47 ते 50.
3. प्रा. त्रिवेणी फरकांडे, सौ. सुलभा गोगे, 'गृहविज्ञान विस्तार', विद्या प्रकाशन नागपूर. 2002 पृ.क्र. 14.
4. प्रा. त्रिवेणी फरकांडे, सौ. सुलभा गोगे, 'गृहविज्ञान विस्तार', विद्या प्रकाशन नागपूर. 2002 पृ.क्र. 14 .
5. प्रा. त्रिवेणी फरकांडे, सौ. सुलभा गोगे, 'गृहविज्ञान विस्तार', विद्या प्रकाशन नागपूर. 2002 पृ.क्र. 14,15 .

6. रत्नाकर गायकवाड यशदा यशमंथन, यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी पुणे, एप्रिल-जुन 2006. वर्ष 7 वे अंक 1. पु. क्र . 3.
7. डॉ. सुधा कोठारी निरूपमा देशपांडे यशदा यशमंथन, यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी पुणे, एप्रिल-जुन 2006. पु.क्र 29, 32.
8. प्रा. प्रदिप दंदे (अमरावती), 'यशमंथन' यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी पुणे, एप्रिल-जून 2006, वर्ष 7 वे, अंक 1ला पृ.क्र. 7,8,9.
9. सुरेश डेरे (उपमहाव्यवस्थापक, नाबार्ड, पुणे) 'यशमंथन' यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी, पुणे, एप्रिल-जुन 2006, वर्ष 7 वे,अंक1ला पृ.क्र. 7,9.
10. ठाकरे गुलाबराव, 'बचतगट एक वरदान', सरस्वती बुक कंपनी मुंबई- 2006 .
11. मा.सुप्रियाताई सुळे लोकराज्य महाराष्ट्र शासन मुंबई 2007 पु.क्र . 4
12. डॉ. स्वाती कर्वे, 'स्त्री विकासाच्या पाऊलखुणा' प्रतिमा प्रकाशन, पुणे. 2007. पृ.क्र. 490,491.
13. प्राची जांभेकर महाराष्ट टाईम्स 2007 ^लोकराज्य*पु. क्र . 3
14. प्रगती बाणखेले ^आत्मसन्मानाची पाऊलवाट*, ^लोकराज्य*महाराष्ट्र शासन 2007 पु. क्र . 3
15. मा. हर्षवर्धन पाटील (मंत्री व महिला व बालकल्याण) लोकराज्य महाराष्ट्र शासन मुंबई. मार्च 2008 पृ. क्र .27.
16. कोमल के आणि के.व्हि.आयन्ना व शिक्रण्णागोस्वामी,'साऊथ ईकॉनॉमिष्ट' Vol-48, जानेवारी -2010 , पृ.क्र. 31,32,33.

17. प्रा. हनुमंत सपकाळ उद्योजक 'महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्, औरंगाबाद, 2008 Vol-XVIII , पृ.क्र. 41,42.43.
18. मा. विलासराव देशमुख, लोकराज्य महाराष्ट्र शासन मुंबई, मार्च 2008 पृ.क्र. 26.
19. माधवी कुंटे, 'स्त्रीसूक्त',डायमंड पब्लिकेशन्स पुणे, 2009 पृ.क्र. 14,15.
20. सुषमा बावळे, 'साऊथ ईकॉनॉमिष्ट', Vol-48, ऑक्टोबर–2010,पृ.क्र. 12,13.
21. माधवी कुंटे, 'स्त्रीसूक्त', डायमंड पब्लिकेशन्स पुणे, 2009 पृ.क्र. 18.
22. डॉ.मुलानी 'यशमंथन' यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी पुणे, सप्टेबर- 2009,वर्ष 3 रे, अंक 3 रा, पृ.क्र. 3,7.
23. माधवी कुंटे,'स्त्रीसूक्त', डायमंड पब्लिकेशन्स पुणे, 2009 पृ.क्र. 19.
24. प्रा. नारायण शिंदे, 'रिसर्च लिंक', -72, Vol - IX (5) ,जुलै -2010 , पृ.क्र. 109, 110.
25. प्रा.डॉ. शंकर अंभोरे आणि प्रा. सौ. पल्लवी भावसार, 'रिसर्च लिंक', -72, Vol - IX (5) ,जुलै -2010 , पृ.क्र. 157,158.
26. एस.व्हि. कुलकर्णी उद्योजक महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्, औरंगाबाद, 2008 Vol- XVIII , पृ.क्र. 39,40.
27. प्रा. व्हि. जे वराडे आणि डॉ. एस.पी. जाधव'रिसर्च लिंक',-76, Vol - IX (5) ,जुलै -2010 , पृ.क्र. 38.39.

28. मा. श्रीमती शकुंतला थोरात (माविमा संचालक) ‘माविम सांगाती*, जागतिक महिला दिन विशेषांक 2011 पृ.क्र. 8.
29. डॉ. स्मीता मेहेत्रे, ^भारतीय स्त्री आणि मानवाधिकार*,श्री साईनाथ प्रकाशन नागपूर- 2011. पृ.क्र. 62.
30. मा. फौजिया खान,(महिला व बालविकास राज्यमंत्री म.राज्य) माविम सांगाती जागतिक महिला दिन विशेषांक मार्च(2011)पृ.क्र. 4.
31. प्रा. गोपाळ कोल्हे आणि प्रा.डॉ. अनिल सरोदे, Entire Research, Vol-3 Issue-III, ठाणे, जुलै - 2010 , पृ.क्र. 80,93.
32. डॉ. लीना कांडलकर, ‘कौटुंबिक संसाधनाची संकल्पना‘, विद्या प्रकाशन, नागपूर. 2012 पृ.क्र. 24.
33. ज. शं. आपटे, पुष्पा रोडे, ‘भारतातील महिला विकासाची वाटचाल‘, डायमंड पब्लिकेशन्स पुणे, 2012 पृ.क्र. 100.
34. डॉ. लीना कांडलकर, ‘कौटुंबिक संसाधनाची संकल्पना‘, विद्या प्रकाशन, नागपूर. 2012 पृ.क्र. 31, 33.
35. ज.शं.आपटे, पुष्पा रोडे, ‘भारतातील महिला विकासाची वाटचाल‘, डायमंड पब्लिकेशन्स पुणे, 2012 पृ.क्र. 51.
36. डॉ. लीना कांडलकर, ‘कौटुंबिक संसाधनाची संकल्पना‘, विद्या प्रकाशन, नागपूर. 2012 पृ.क्र. 56.
37. आंतर संसदीय संघ (आय पी यू) वार्षिक विशेषांक अहवाल 2013
38. ऑर्गनायजेशन फॉर इकॉनॉमिक्य को-ऑपरेशन ॲण्ड डेव्हलपमेंट 2014. (दै.लोकमत 9 मार्च 2014 पृ.क्र. 7.)